Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

जा.क्र.कोविमं/भांडार/ 1223 दिनांक :- 27/03/2026

प्रति,
व्यवस्थापक,
------------------------------
------------------------------
------------------------------

विषय :- वापरलेल्या २४x३६ व १५x२४ आकाराच्या गनी बॅग (Laminted Polypropylele Bag) विक्रीबाबत

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयातील २४x३६ व १५x२४ आकाराच्या गनी बॅग (Laminted Polypropylele Bag) निर्लेखन/विक्री करावयाचे असून त्यासाठी खालील अटी व शर्तीनुसार सोबतच्या तक्त्यानुसार सीलबंद दरपत्रक दि. 27/03/2026 ते दि. 07/04/2026 या कालावधीत मागविण्यात येत आहेत. सोबत दरपत्रक जोडले आहे.

१. सोबतच्या विहीत दरपत्रकामध्येच दर सादर करावे लागतील.
२. दरपत्रकामध्ये खाडाखोड असलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.
३. दरपत्रक भरताना वाहतूक/हमाली/इतर खर्च विचारात घेवून दरपत्रक सादर करावे.
४. वाहतूक खर्च किंवा हमाली किंवा इतर खर्च देय असणार नाही. सदरचा खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे.
५. विक्री करण्यात येणाऱ्या गनी बॅग अंदाजे वजन दरपत्रकात नमूद केले आहे.
६. दरपत्रकासोबत आधारकार्ड व पॅनकार्डची स्वंसाक्षांकीत छायाप्रत जोडणे आवश्यक.
७. सदर गनीबॅगवर गोपनीय स्वरुपाचा मजूकर व कार्यालयाचा लोगो असल्यामुळे सदर साहित्याचा दुरुपयोग होणार नाही व गोपनीयतेचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी. गोपनीयतेचा भंग झाल्यास अथवा दुरुपयोग झाल्यास संबंधितावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.
८. रिकाम्या गाडीचे वजन करणे व भरलेल्या गाडीचे वजन करणे हे काम ठेकेदाराचे असून सदरचे वजन मंडळाच्या प्रतिनिधीच्या समक्ष करावे लागेल.
९. ज्या दरपत्रका धारकाचे दर उच्चतम असतील त्या ठेकेदारास ठेका मंजूर करण्यात येवून त्याच्या लेखी संमतीनंतर कार्यादेश देण्यात येतील.
१०. कार्यादेश दिल्यानंतर गनी बॅग उचलण्याकरीता कार्यालयीन १५ दिवसाचा कालावधी देण्यात येईल.
११. गनी बॅग कार्यालयातून नेणेपूर्वी रू.३०००/- इतकी आगाऊ रक्कम मंडळात रोखीने अथवा आरटीजीएस द्वारे भरणा करावी लागेल, त्यानंतरच ठेकेदारास द्वारपरवाना (गेट पास) देण्यात येईल.
१२. सदर गनीबॅग पल्पींग केलेबाबत प्रमाणपत्र ३० दिवसात सादर करणे बंधनकारक राहील.
१३. कोणतेही दरपत्रक पूर्णत:/अंशत: स्वीकारणे /नाकारणे याचे अधिकार मंडळाने राखून ठेवलेले आहेत.

2.3.26
(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education Kolhapur Divisional Board Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

## दरपत्रक

वापरलेल्या २२x३६ व १५x२४ आकाराच्या गनीबॅग (Laminated Polypropylele Bag) विक्रीबाबत

दरपत्रकधारकाचे नाव व संपुर्ण पत्ता -----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक -------------------------- मोबाईल क्रमांक --------------------------------------

आयकर पॅन क्रमांक -------------------------------------------------------------------------

वस्तू व सेवाकर जीएसटी नोंदणी क्र -------------------------------------------------------------

| अ.क्र. | साहीत्याचा तपशील | विक्री करावयाच्या गनीबॅगचे अंदाजे वजन (किलो मध्ये) | दर प्रती किलो (सर्व करासहीत व वाहतूक, हमाली, इतर खर्चासह) | गनीबॅग पल्पींग करणाऱ्या मिलचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | वापरलेल्या २२x३६ आकाराच्या गनीबॅग (Laminated Polypropylele Bag) | ७,७७९ | | |
| २ | वापरलेल्या १५x२४ आकाराच्या गनीबॅग (Laminated polypropylele Bag) | ३,५२५ | | |

क्र.कोविमं/भांडार/ दिनांक : नुसार मी दरपत्रक दिलेले आहे.

स्थळ :
दिनांक :

दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व शिक्का

मसुदा मान्यतेस्तव सादर.